दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२३ जुलै २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक २३७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 23 July 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 2nd | Issue 237 | Pages 4 | Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

साखर कारखान्याची काटामारी थांबवण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करावा-राजू शेट्टी

पश्चिम महाराष्ट्रात शासनाने व्यापक धोरण राबवावे

सातारा (वृत्तसंस्था)-ऊस शेतीत 'एआय' तंत्रज्ञान आलं पाहिजे, अशी भाषा मंत्री, कारखानदार करत आहेत. याला 'स्वाभिमानी'चाही विरोध नाही; पण साखर कारखान्यातील काटामारी थांबविण्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानाचाही वापर करावा. नुसते कारखानदारांच्या बाजूचे तंत्रज्ञान असेल तर मान्य होणार नाही, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खा.राजू शेट्टी यांनी दिला. सातारा येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत माजी खासदार शेट्टी बोलत होते. यावेळी संघटनेचे राज्य प्रवक्ते अनिल पवार, जिल्हाध्यक्ष राजू शेळके, सातारा तालुकाध्यक्ष रमेश पिसाळ, खटाव तालुकाध्यक्ष दत्तू काका घार्गे, वाहतूक संघटना जिल्हाध्यक्ष मनोहर येवले, कायदेशीर सल्लागार चव्हाण, भुजबळ मामा, महादेव डोंगरे, शरद इंगळे, नितीन काळंगे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, अलीकडील काळात 'एआय' तंत्रज्ञान आलं पाहिजे, अशी वक्तव्ये होत आहेत. आमची भूमिका ही जगातील अत्युच्च तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलं पाहिजे अशीच आहे. साखर कारखानदारांनी लालचीपणाने कारखान्यांची गाळप क्षमता वाढवलीय. गेल्यावर्षी तर सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने तीन महिनेच चालले आहेत. आता कारखान्यांना उसाची गरज भासतेय. यासाठी एकरी १२५ टन उत्पादन निघाले पाहिजे, अशी कारखानदारांची भूमिका आहे. 'एआय' तंत्रज्ञान चांगले; पण ते चोहोबाजूंनी असावे. राज्यात २०० कारखाने आहेत. या कारखान्यांत ऑनलाइन वजनकाटे करा. त्यामुळे वजनाशी छेडछाड होणार नाही, अशी मागणी ८ वर्षांपासून करीत आहोत; पण याकडे दुर्लक्ष होत आहे. आताचे 'एआय' तंत्रज्ञान हे कारखान्यातील काटामारी थांबविण्यासाठी ही वापरायला हवे.

शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गासाठी सर्व्हे करण्यात येत आहे; पण शेतकऱ्यांचा विरोध होतोय. त्यामुळे शासनाने कितीही रेटा निर्माण केला तरी तो होऊ देणारच नाही. त्याचबरोबर शक्तिपीठ मार्गात देवाची नावे घेतात. या देवांसाठी पूर्वीच रस्ते झालेले आहेत. या शक्तिपीठातून ५० हजार कोटी रुपये कमवायचे आहेत. पात्रादेवीचे नाव घेतले जाते; पण त्यापलीकडे गोवा राज्य लागते. या गोवा राज्यातील सीमेवरील गावातच १५-२० दारूची दुकाने आहेत. त्यासाठीच हा मार्ग नाही ना? दळणवळणाच्या सोयी हव्यात; पण शेतकऱ्यांचा बळी देऊन नको, असेही राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्गाबाबत सुनावले.

आमदारांना लोक रस्त्यावर जोड्याने मारतील

विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान, आमदारांची बाचाबाची आणि कार्यकर्त्यांच्या मारहाणीबद्दलही शेट्टी यांनी भाष्य केले. राज्यात सरकार आहे कुठे हेच दिसत नाही. आम्ही निवडून दिलेले आमदार आणि कार्यकर्ते विधानभवनात मारहाण करतात. त्यांना रस्त्यावर जोड्याने मारतील, असा इशाराही शेट्टी यांनी दिला.

पश्चिम महाराष्ट्रात शासनाने व्यापक धोरण राबवावे

ऊसाला कोयता लावण्यापूर्वी शेतकऱ्याला उत्पादन किती होईल, रिकव्हरी किती येईल, यासाठीचे तंत्रज्ञान यावे. यावरून शेतकरी ठरवेल ऊस आता घालायचा की महिन्याने असे सांगून माजी खासदार शेट्टी पुढे म्हणाले, सरकार शेतकऱ्यांवर सतत अन्याय करत आहे. सिंचनासाठी सौरऊर्जा पंप देण्यात येत आहेत. या पंपाने आवश्यक तेवढा दाब मिळत नाही. नवीन वीज कनेक्शन बंद केलीत. पश्चिम महाराष्ट्र हा डोंगरात आहे. त्यामुळे नदी, विहिरींतून दूर पाणी नेता येत नाही. यासाठी शासनाने व्यापक धोरण राबवायला हवे. जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना फसवलं जात आहे.

मंत्री माणिकराव कोकाटे विरोधात बीडमध्ये छावा संघटना आक्रमक

बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

सुरज चव्हाण जिथे दिसेल तिथे त्याला चोप देऊ-बीड छावा संघटनेचा इशारा

बीड । बालाजी जगतकर

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानभवनामध्ये रमी खेळतानाचा व्हिडिओ समोर आल्यानंतर छावाचे विजयकुमार घाडगे यांनी थेट सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेमध्ये पत्ते फेकून जबाब विचारला होता. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आणि सुरज चव्हाण यांच्याकडून त्यांना मारहाण झाली होती. या मारहाणीच्या निषेधार्थ बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली आहेत. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि सुरज चव्हाण यांच्या प्रतिमेवर पत्ते फेकून छावाच्या अशोक रोमन यांनी हे निदर्शने करून तीव्र निषेध व्यक्त केला आहे. त्याचबरोबर बीड पॅटर्न काय असतो ? तो सुरज चव्हाण ला दाखवून देऊ आणि सुरज चव्हाण जिथे दिसेल तिथे त्याला चोप देऊ, असा इशारा छावाच्या अशोक रोमन यांनी दिला आहे. या प्रसंगी असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यासमोर उपस्थित होते.

उपराष्ट्रपती पदासाठी हरिभाऊ बागडे यांचे नाव चर्चेत

राजस्थानचे राज्यपाल होण्याआधी होते महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष

मुंबई (वृत्तसंस्था)-उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणामुळे अचानक राजीनामा दिला आहे. या घटनाक्रमामुळे देशभरात उपराष्ट्रपती पदाच्या निवडीसाठी चर्चांना उधाण आले आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील एक प्रमुख नेत्याचे नाव उपराष्ट्रपती म्हणून चर्चेत आहे, राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणावरून आपला राजीनामा दिला आहे. संसदेत पावसाळी अधिवेशन चालू असतानाच हा राजीनामा समोर आला, आणि यामुळे उपराष्ट्रपती पदावर पुढे कोण येणार याबाबत चर्चा सुरू झाली आहे. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याने आता नवीन उपराष्ट्रपती कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून यासाठी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू झाली आहे.

उपराष्ट्रपती पदाच्या चर्चेत सध्या एक महाराष्ट्रातील नाव पुढे येत आहे, आणि ते म्हणजे हरिभाऊ बागडे. महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि राजस्थानचे राज्यपाल असलेल्या हरिभाऊ बागडेंच्या नावाची उपराष्ट्रपती म्हणून निवड होऊ शकते, असे बोलले जात आहे. हरिभाऊ बागडे हे फुलंब्री विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा आमदार राहिले आहेत. त्यांना लोक नाना म्हणून ओळखतात, आणि त्यांचा जीवनप्रवास एक प्रेरणादायी आहे. शेतकरी कुटुंबातून आलेले हरिभाऊ यांनी लहानपणी घराघरात जाऊन वृत्तपत्र विकले होते. शेतकरी कुटुंबात वाढलेल्या हरिभाऊंना शेती प्रती विशेष आकर्षण आहे, आणि त्यांचं नामकरण कृषी योग असे करण्यात आले आहे.

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा केज तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांची निवड

केज । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा केज तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांची निवड करण्यात आली आहे.

पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे,केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिताताई अक्षयजी मुंदडा व केज विधानसभा मतदार संघाचे किंगमेकर नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा तसेच युवकांचे हृदयसम्राट युवानेते पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षयजी नंदकिशोर मुंदडा तालुका अध्यक्ष संदीप पाटील यांच्या आदेशाने भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत केले जात असुन त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांच्या निवडीमुळे युवकांचे संघटन मोठ्या प्रमाणात होणार असून भारतीय जनता पक्षाची ताकद वाढणार असल्याचे चित्र दिसत आहे.

अरबी समुद्र खवळणार:कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना

मुंबई (वृत्तसंस्था)-भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राने महाराष्ट्रातील किनारपट्टी भागात मोठ्या उंचीच्या लाटांचा इशारा दिला आहे. यानुसार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर आणि उपनगर भागातील समुद्रकिनाऱ्यावर २३ जुलै सायंकाळी ५.३० वाजल्यापासून २४ जुलै रात्री ८.३० वाजेपर्यंत ३.६ ते ४.३ मीटर उंच लाटा उसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच, पालघर व रायगड जिल्ह्यांमध्ये २४ जुलै रात्री ८.३० पर्यंत ३.४ ते ३.८ मीटर उंच लाटा उसळू शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर लहान होड्यांनी समुद्रात न जाण्याच्या सूचना प्रशासनाकडून दिल्या असून, मत्स्य व्यावसायिक आणि स्थानिक नागरिकांनी दक्ष राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ही माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून अधिकृतपणे देण्यात आली आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह सातारा घाट व कोल्हापूर घाट भागात पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याच्या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासनांना पूर्ण सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) यांना तात्काळ सज्ज राहण्यास सांगितले आहे.

राम वडगाव येथील युवकांचा शेकाप पक्षात जाहिर प्रवेश

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील रामवडगाव (युसुफ वडगाव) येथे गावातील युवकांनी शेतकरी चळवळ प्रभावी करत वाढवण्यासाठी तसेच शेतकऱ्याच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते शेतकऱ्यां साठी अहोरात्र काम करणारे भाई मोहन गुंड यांच्या उपस्थितीत गावातील दिगंबर पांचाळ,शिवराज थळकरी,राहुल सावंत, राजाभाऊ थळकरी, शिवराज महादेव थळकरी,खंडू विभुते, अविनाश खरबड, शिवराज गणेश खानवरे शिवराय महाराज स्वामी यांनी शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी ड.जगन्नाथ थळकरी,प्रभुलिंग स्वामी,छबु मोडवे, भगीरथ मानधने,विष्णू देशमाने गुरुप्रसाद थळकरी,भाई राचलिंग पाटील,भाई अशोक रोडे,भाई अंगद ससाणे इतर शेतकरी उपस्थित होते.सर्वांच्या बैठकीत एकमताने कुठले ही राजकारण न करता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्र येऊन लाल बावटा घेऊन काम करण्याच्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

संपादकीय

परिवर्तनाची ११ वर्षे

भारतात गेल्या ११ वर्षांत राजकीयच नव्हे तर अनेक क्षेत्रांत मोठे परिवर्तन झाले आहे, त्याचे सर्व श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला आहे. या काळात संसदेत व संसदेबाहेर विरोधी पक्षांनी मोदी सरकारवर अनेक मुद्द्यांवर प्रहार केले पण पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळात विरोधकही सहभागी झाले. गेल्या ११ वर्षांत देशाची प्रगती व विकास विलक्षण झाला आणि देशातील गोरगरीब, सामान्य व उपेक्षितांपर्यंत पोहोचला. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक पातळीवर लक्षणीय झेप घेतली. ११ वर्षांत देशातील सर्वाधिक लोकप्रियता व विश्वास नरेंद्र मोदी यांनी संपादन केला आणि सर्वाधिक सदस्य नोंदणी झालेला भारतीय जनता पक्ष हा जगात नंबर १ राजकीय पक्ष झाला, यामागे नरेंद्र मोदी आणि अमितभाई शहा यांचे परिश्रम व संघटन कौशल्य आहे.

मोदी सरकारच्या परराष्ट्रनीती व कूटनीतीमुळे जगात भारताची वेगळी ओळख बनली आहे. जगात भारताने अर्थव्यवस्थेमध्ये जपानला मागे सारून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. काश्मीर खोऱ्यात रेल्वे धावू लागली आहे. काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वेने प्रवास करण्याचे स्वप्न साकार झाले आहे. भारताला जगातील महासत्ता बनविण्याचे मिशन मोदी सरकारने हाती घेतले आहे.

गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने जगात भारत हा एक शक्तिशाली देश आहे, अशी प्रतिमा निर्माण केली. देशाच्या सरहद्दीवर कठोर व मजबूत उपाय योजले म्हणूनच भारताच्या सीमारेषांना धक्का लावण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही, अशी व्यवस्था केली. ज्या वेळी शेजारी शत्रूंनी कुरापती काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना वेळीच भारताने धडा शिकवला. चिनी सैन्याने घुसखोरीचा प्रयत्न केला तेव्हा डोकलाम किंवा गलवान खोऱ्यात त्यांना सडेतोड जबाब देऊन पिटाळून लावले. पुलवामा, पठाणकोट असो किंवा पहलगाम, पाकिस्तानप्रेरित झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना भारताने जबरदस्त उत्तर दिले. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, तर कधी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा करून दहशतवादी तळांबरोबरच पाकिस्तानचे हवाई तळांचे मोठे नुकसान केले. काश्मीरमधील दहशतवाद आणि छत्तीसगडमधील नक्षलवाद मोडून काढताना मोदी सरकारने कणखरपणा दाखवला. पहलगाममध्ये २६ हिंदू पर्यटकांची निर्घृण हत्या झाल्यानंतर भारताने पाकिस्तावर सैन्य कारवाई केलीच, पण पाकबरोबर झालेले सर्व द्विपक्षीय समझोते रद्द केले आणि सतलज नदीचे पाकिस्तानात जाणारे पाणीही रोखले.गेल्या ११ वर्षांत देशातील २६ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले ही मोदी सरकारची मोठी जमेची बाजू आहे. जागतिक बँकेच्या अहवालातच ही बाब नमूद करण्यात आली आहे. पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजना, जनधन योजना, आयुष्यमान भारत योजना, अशा योजनांनी सर्वसामान्य जनतेच्या जीवनात फरक पडला आहे. देशातील ८० कोटी गरीब जनतेला दरमहा पाच किलो धान्य दिले जाते, त्यामुळे या देशात कोणी उपाशी राहू नये याची काळजी सरकारने घेतली आहे. बँकिंग व आरोग्य सेवा, प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण, डिजिटल व्यवहार, मजबूत व पारदर्शी पायाभूत सुविधा, सर्व लाभ थेट लाभार्थींना वेळेत पोहोचविण्याची कार्यपद्धती यामुळे पंचवीस कोटी लोक गरिबीतून बाहेर येण्यास मदत झाली. पूर्वीच्या काळात ग्रामीण भागात घरात एक कंदील असायचा. तेव्हा वीज गावागावात नव्हती आणि केरोसीनही परवडत नव्हते. वीज वारंवार खंडित होत असे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीतच मोदींनी २४ तास घरोघरी सर्वांना वीज देण्याचे आश्वासन दिले होते. ११ वर्षांच्या कारकिर्दीत सर्व गावागावांत वीज पोहोचली आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना सर्वत्र राबवली जाते आहे.

घरात शौचालय नाही म्हणून बाहेर उघड्यावर विधी करायला जाणाऱ्या जनतेची संख्या देशात कोट्यवधी होती. विशेषत: ग्रामीण भागात ही समस्या मोठी होती. मोदींनी स्वच्छ भारत योजना सुरू केली. उघड्यावर विधी केल्याने अस्वच्छता पसरते व त्यातून आजार व रोगराई निर्माण होते असा प्रचार केला गेला. जागतिक आरोग्य संघटनेने भारताचे या उपक्रमाचे कौतुक केले. आज देशात १२ कोटी शौचालये उभारण्यात आली असून ६० कोटी लोक त्याचा वापर करीत आहेत. दि. १ मे २०१६ रोजी पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजना सुरू झाली. गरीब महिलांना मोफत एलजीपी गॅस कनेक्शन मिळू लागले. स्वयंपाकाच्या चुलीच्या धुरापासून महिलांना मुक्तता मिळाली. उज्ज्वला योजनेतून १० कोटी महिलांना गॅस कनेक्शन मिळाले आहे. देशातील कोट्यवधींचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्येत मोदी सरकारने भव्य राम मंदिर उभारून दाखवले. पण देशातील मंदिरे व तीर्थस्थळांचाही पुनर्विकास केला. काशी विश्वनाथ कॉरिडोर, महाकाल लोक उज्जैन, माँ कामाख्या मंदिर, केदारनाथ धाम, जुने सोमनाथ मंदिर यांच्या जीर्णोद्धारातून अध्यात्मिक क्षेत्राला नवीन ऊर्जा मिळाली. तीर्थस्थळांवर पर्यटन व अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली. चारधाम राजमार्ग परिवहन योजना, हेमकुंडसाहिब रोप-वे योजना राबवताना भारत - पाकिस्तान सरहद्दीनजीक असलेल्या कर्तारपूर कॉरिडॉरमुळे भारतीय शिखांना तेथे जाण्याचा मार्ग सुलभ झाला. गेल्या वर्षभरात भारतात ९.६६ दशलक्ष विदेशी पर्यटक आले. त्यातून २ लक्ष ७८ हजार कोटी भारताला विदेशी चलन मिळाले. दरवर्षी विदेशी पर्यटकांची भारतात येण्याची संख्या वाढत आहे. प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय पोलीस स्मारक, जालियनवाला बाग स्मारक, राष्ट्रीय युद्ध स्मारक, आदिवासी स्वतंत्रता सेनानी संग्रहालय, भारत मंडपम, नवीन संसद भवन, या देशाला प्रेरणा, ऊर्जा देणाऱ्या व अभिमान वाटणाऱ्या वास्तू गेल्या ११ वर्षांतच उभ्या राहिल्या आहेत. एक भारत-श्रेष्ठ भारत, काशी तमिल संगम अशा उपक्रमांमुळे भारतातील विविध भाषा व संस्कृती यांच्यात सेतू निर्माण करण्याचे काम केले आहे. प्रयागराज येथे महाकुंभला ६६ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले. मोदींनी योग दिनाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. सन २०२४ मध्ये उत्तर प्रदेशात २६ लाख लोकांनी योगाची ऑनलाइन घेतलेल्या शपथ उपक्रमाची विश्वविक्रम म्हणून नोंद झाली.वंदे भारत ट्रेन ही मोदी सरकारने दिलेली देणगी आहे. देशात सर्वाधिक लोकप्रिय ही ट्रेन ठरली असून तिची मागणी वाढते आहे. कटरा ते श्रीनगर मार्गावर सर्वात उंचीवर असलेल्या चिनाब पुलावरून वंदे भारत धावू लागली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून १२ कोटी शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये दिले जात आहेत. आयुष्यमान भारत योजनेतून ५० कोटी लोकांना पाच लाखांपर्यंत आरोग्य सेवा मोफत मिळू शकेल. अंतराळ क्षेत्रातही गेल्या ११ वर्षांत भारताने भरीव कामगिरी केली आहे. सन २०१७ मध्ये इस्त्रोने १०४ उपग्रहांचे प्रक्षेपण करून विश्वविक्रम निर्माण केला.

विद्यापीठांची जबाबदारी

महाराष्ट्रातील व एकंदरच भारतातील समाज गेल्या दोन दशकांपासून अनेक बदलांचा सामना करीत आहे. सन २०००च्या सुमारास भारतात स्मार्टफोनचे आगमन होऊन झपाट्याने त्याचे सार्वत्रिकीकरण झाले. त्यासोबतच भारताच्या औद्योगिक पटलावर आयटी आणि आयटीईएसच्या कंपन्यांचा उदय झाला. त्यामुळे रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले. जरी भारतीय कंपन्या भारतीय तरुणांना अतिशय कमी पगारात वापरून घेत असल्या तरीही भारतीय जीवनमानाच्या दृष्टीने तरुण-तरुणींना पुरेसा पैसा वापरायला मिळू लागला. त्याचे समाजावर जसे चांगले परिणाम झाले तसेच दुष्परिणाम देखील समाजात दिसायला लागले. हा बदल इतक्या झपाट्याने झाला की, त्याला अनुसरून समाजातील संस्थांना बदल करायला वेळच मिळाला नाही. हा बदल जसा सुखावह होता तसाच त्या बदलाने समाजात काही प्रश्न देखील निर्माण केले. त्या प्रश्नांचे स्वरूप जसे सामाजिक होते तसे नैतिकही होते. प्रश्नाच्या या दोन्ही बाजू समजून घेण्यात समाजाला आधार देणाऱ्या संस्था कमी पडल्या, असे खेदाने म्हणावेसे वाटते. त्याची कारणे काहीही असली तरी हे कटू सत्य आहे.

आज भारतातील तरुणांची मोठी संख्या पुणे, बेंगळुरू, हैदराबाद व तत्सम शहरांत आहे. त्यांचे पालक उर्वरित भारतात राहत आहेत. पालक व पाल्य यांचा जिवंत संबंध फार कमी झाला आहे. जे तरुण-तरुणी विदेशात आहेत त्यांची व त्यांच्या पालकांची अवस्था तर याहूनही बिकट आहे. ग्रामीण भागाचा विचार केल्यास आज शेतीसाठी मजूर नाहीत, परंतु पान ठेल्यावर दिसणाऱ्या तरुणांची संख्या लक्षणीय आहे. शेतीत काम करण्याची लाज वाटते, परंतु कमी वेतनावर मॉल किंवा तत्सम ठिकामी काम करणे भूषणावह वाटते. मुलांना या कमी पगाराच्या नोकऱ्या करणे आवडते, असे नाही. पण त्यांचा नाईलाज आहे. पदवी, पदव्युत्तर व तत्सम शिक्षण घेऊनही त्यांना कमी पगाराच्या नोकऱ्या कराव्या लागतात. शिकल्यामुळे त्यांना शेतीत काम करणे कमीपणाचे वाटते, व इतर जास्त पगाराच्या नोकऱ्या करण्याइतपत शिक्षण व कौशल्य त्यांच्याजवळ नसते. हे सर्व विद्यार्थी आयटी वा उच्च पगाराच्या नोकऱ्या करणाऱ्या त्यांच्या पुणे, बेंगळुरूमधील समवयस्कांशी सतत तुलना करून वैफल्यग्रस्त होतात. असे विद्यार्थी प्रत्येक विद्यापीठाच्या परिक्षेत्रात लाखोंनी आहेत.

या मुलांचे शिक्षण कौशल्यपूर्ण नाही. विद्यापीठांनी व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना कौशल्य द्यावे असा विचारच केला नाही. उदाहरण द्यायचे तर, बीकॉम झालेल्या विद्यार्थ्याकडे ऑडिट आणि अकाउंटिंग करण्याचे कौशल्य नसते. या विद्यापीठांना आपण जर समाजाचे अभिन्न अंग मानले तर त्यांना या समस्येची दखल घ्यावीच लागेल. देशभरातील विद्यापीठांमध्ये चार कोटीच्या वर विद्यार्थी शिकत आहेत. महाराष्ट्रात ही संख्या जवळजवळ ३५ लाखाच्या वर आहे. म्हणजे विद्यापीठाजवळ विपुल प्रमाणात मनुष्यबळ आहे. समाजात अनेक अशा समस्या आहेत की ज्या सोडविण्यासाठी कल्पनाशक्तीसोबतच मुनष्यबळाची देखील गरज आहे. उदाहरण द्यायचे तर गडचिरोली जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विज्ञान, गणित व भाषा विषयाचे शिक्षक नाहीत, किंवा अपुरे आहेत. तर त्यासाठी गोंडवाना विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाचे संबंधित शिक्षक व विद्यार्थी आठवड्याचे काही तास त्या शांळामध्ये शिकवायला जाऊ शकतील. त्यामुळे शिक्षकांची कमतरता अंशत: भरून निघेल व 'वीर बाबूराव शेडमाके कमवा व शिका योजने'तून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. विद्यार्थ्यांची व शाळेची दोघांचीही समस्या दूर होण्यास त्यातून मदत होईल व सोबतच आवश्यक असा जीवनानुभव मिळेल.

गडचिरोली जिल्ह्याचा ७८ टक्के भाग जंगलव्याप्त आहे. पेसा कायद्याच्या अन्वये प्रत्येक ग्रामसभेला सामूहिक वन हक्क मिळणार आहेत. परंतु त्यासाठी प्रशासनाकडे जमा करावयाची कागदपत्रे तयार करण्यात आदिवासी समाज कमी पडतो. परिणामी त्या ग्रामसभांना हक्काचे जंगल व निर्वाहाचे साधन मिळत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते व महानगरांवर त्याचा भार पडतो. अशा कामासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून गोंडवाना विद्यापीठाच्या एकल प्रयोगात काम करण्याची संधी देता येऊ शकते. त्याद्वारे पैसे, विद्यार्थ्यांना जीवनानुभव, ग्रामसभांना प्रशिक्षण व सामूहिक वन हक्क तसेच विद्यार्थ्यांना व शिक्षकांना समाधान मिळेल.

अनेक युवकांना व त्यांच्या पालकांनाही समुपदेशनाची गरज असते. विद्यापीठे त्यांत मदत करू शकतात. पोलिसांच्या ' भरोसा सेल 'मध्ये समुपदेशनाचे काम चालते. त्यास विद्यापीठ पुरक म्हणून काम करू शकते. महानगरामध्ये वृद्धांचा एकटेपणा ही समस्या आहे. विद्यार्थ्यांनी अशा वृद्धांना आवश्यक अशी मदत केली, सोबत केली व विद्यापीठाने त्यांना इंटर्नशिपचे वेतन दिले तर विद्यार्थ्यांना जीवनानुभव मिळेल व पैसेही मिळतील. अशा अनेक प्रकारच्या समस्या समाजात आहेत. त्या त्या भागातील विद्यापीठांनी जर अशा समस्या शोधून विद्यार्थी व शिक्षक यांना या कामासाठी प्रोत्साहित केले तर महाराष्ट्रातील ३५ लाख विद्यार्थ्यांची इंटर्नशिपची समस्या सुटू शकते.विद्यापीठे स्वायत्त आहेत व सध्याच्या काळात शासन व विद्यापीठ अनुदान आयोग विद्यापीठांच्या पाठीशी आहे. त्याचा उपयोग करून ज्या क्षेत्रात कौशल्याची गरज आहे त्या क्षेत्रातील कौशल्य असणारे मुनष्यबळ तयार करणे शक्य आहे. दुसरे म्हणजे जे विद्यार्थी विद्यापीठांमधून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊनही बेरोजगार आहेत, अथवा अपुऱ्या रोजगारावर काम करीत आहेत त्यांच्या कौशल्याची व्यवस्था विद्यापीठे सामाजिक जबाबदारी म्हणून करू शकतात. जो समाज विद्यापीठबाह्य आहे व जो विद्यापीठाकडे आशेने बघतो आहे. त्याच्या समस्यांची सोडवणूक विद्यार्थी व प्राध्यापक यांनी मिळून करता येईल. कदाचित यातून विद्यार्थ्यांना पुढे अर्थार्जनाच्या संधीही दिसू लागतील. आज काही विद्यापीठे सोडल्यास बहुतांश विद्यापीठांकडे पुरेसा निधी आहे. आज विद्यापीठांवर समाज वर्षाकाठी अब्जावधी रुपये खर्च करतो. त्यांचे फलित म्हणून विद्यापीठांनी केवळ शिकवणे, परीक्षा घेणे व निकाल लावणे एवढेच काम न करता अशा प्रकारे समाजाची मदत केल्यास विद्यापीठांबाबत समाजात विश्वासाचे स्थान निर्माण होईल.ही सामाजिक जाणीव न ठेवल्यास विद्यापीठांना मोठ्या असंतोषाला सामोरे जावे लागू शकते. आज विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविरहित शिक्षणाने जसे नैराश्य आहे तसेच पाल्यांच्या या अवस्थेमुळे त्यांचे पालकही नैराश्यग्रस्त आहेत. या स्थितीत विद्यापीठांनी ही सामाजिक जबाबदारी घ्यावी, असे वाटते. असे झाले नाही तर विद्यापीठांचे 'ओझे' समाजाने का वाहावे, असा प्रश्न समाजापुढे पडल्यास आश्चर्य वाटायला नको. असा प्रश्नांवरील उत्तरे समाज त्याच्या त्यांच्या पद्धतीने व वकुबाप्रमाणे शोधेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे पुढील विचार करून विद्यापीठांनी वेळीच सावध होऊन उपाययोजना करण्याची गरज आहे. अन्यथा, सन १९७४मध्ये ज्या प्रमाणे जयप्रकाश नारायण यांनी आंदोलन सुरू केले होते तसेच आंदोलन पुन्हा एकदा उभे राहू शकते होईल. खरोखर असे आंदोलन उभे राहिल्यास विद्यापीठांना त्याची काय किंमत मोजावी लागेल, याची कल्पनाही करवत नाही.

शिक्षणाचा नवा पर्याय; अकरावीला वळसा

तुम्ही कितीही हुशार असाल, तरीही ग्रॅज्युएट नसाल तर तुमच्या हुशारीची किंमत शून्य करणारी मानसिकता गेल्या काही वर्षांत भारतीय मनामध्ये बिंबलेली आहे. शिक्षण कशासाठी घ्यायचे ते चांगल्या पगाराची नोकरी लागावी यासाठीच. मध्यमवर्गीय, सर्वसामान्य कुटुंबातील पालकांचा कल तोच असायचा. पण, पंधरावीपर्यंत शिक्षण घेण्यासाठी महाविद्यालयातील अकरावीतील प्रवेश ही पहिली पायरी असताना यंदा मात्र, वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. अकरावी प्रवेशासाठी राज्यातील महाविद्यालयातील रिक्त कोटा अद्याप भरलेला नाही. त्यातून विद्यार्थी पालकांकडून अकरावी प्रवेशाकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले आहे.

दहावीनंतर विद्यार्थी प्रवेशासाठी अकरावी-बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान या अभ्यास शाखांचा प्राधान्याने विचार करताना आढळतात. मात्र, या व्यतिरिक्त पुढील शिक्षणाचे इतरही महत्त्वाचे पर्याय उपलब्ध आहेत. सध्या काही अभ्यासक्रमांचा अपवाद वगळता अनेक अभ्यासक्रमांमध्ये पदवीची ५ वर्षे आणि त्याचबरोबर कॉम्प्युटर आणि तत्सम व्यावसायिक कोर्स केल्याशिवाय नोकरी मिळण्याची शक्यता फारच कमी असल्याने, अकरावीत प्रवेश घेऊन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे बहुसंख्य पालकांचा कल असतो.

डॉक्टर, इंजिनीयर, वकील बनण्यासाठी किमान बारावी पास होऊन पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा होत असला तरी, अकरावी प्रवेश न घेता, अन्य अभ्यासक्रमांना प्राधान्य देणारी विद्यार्थी पालक वर्गाची व्यवसायमुख मानसिकता नक्कीच पुढील शैक्षणिक धोरणात बदल घडवायला लावणारी आहे. यंदा अकरावीच्या प्रवेशासाठी राज्यभरात विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज दाखल करून घेण्यात आले आहेत. त्यानुसार इयत्ता अकरावीसाठी सुमारे २१ लाख २३ हजार जागा उपलब्ध आहेत. मात्र, केवळ १२ लाख ७१ हजार विद्यार्थ्यांनीच अर्ज केल्याने जवळपास ८ लाख जागा शिल्लक राहणार आहेत. पारंपरिक शिक्षण पद्धतीकडे पाठ फिरवत दहावीच्या या आठ लाख विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावीत प्रवेश न घेता अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्राधान्य देतील, असे मानायला हरकत नाही. राज्याच्या शिक्षण विभागाकडून अकरावी इयत्तेसाठी महाविद्यालयांना विद्यार्थी संख्येचा कोटा वाढवून दिला आहे. राज्यात अनेक नवीन महाविद्यालयांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे महाविद्यालयात अकरावीच्या जागा अधिक आणि प्रवेश घेणारी मुले कमी अशी स्थिती निर्माण झाली आहे.

सध्या वाढती महागाई पाहता मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांच्या पालकांची चालली आर्थिक ओढाताण दिसते. त्यामुळे पदवी घेण्यामध्ये वर्ष आणि पैसे खर्च होतात, असा त्यांचा दृष्टिकोन बनलेला आहे. दहावीनंतर २ ते ३ वर्षांत व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून हे विद्यार्थी अर्थार्जनाकडे वळतात. मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलांकडून पैशाचा आणि लवकर स्थिर होण्याचा विचार करूनच व्यावसायिक अभ्यासक्रम हा पर्याय सध्या निवडला जात आहे. काही अल्प मुदतीचे अभ्यासक्रम आहेत. ते पूर्ण केल्यानंतर मुलाची अर्थाजनासाठी मदत मिळेल, असा विचार काही पालक करतात. एमकेसीएलचे एमएससीआयटी/कोरल ड्रॉ, ॲडव्हान्स एक्सेल, फोटोग्राफी, तसेच एमएसएमई, खादी ग्रामोद्योग, सी बी कोरा ग्रामोद्योग संस्था, जन शिक्षण संस्था, कृषी विद्यापीठे, यांसारख्या संस्थामधून वर्षभर अनेक अल्प मुदतीचे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्याला पदवी शिक्षणाची गरज नाही. स्वयं रोजगार उपलब्ध होण्यास या अभ्यासक्रमांचा चांगला उपयोग होत आहे, असा मानणारा पालक वर्ग तयार होताना दिसत आहे.

दुसऱ्या बाजूला, परदेशात शिक्षण घेऊन तिथे गलेलठ्ठ पगाराची नोकरी करणे हा ट्रेंड वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना परदेशात आता शिक्षणासाठी जाण्याची गरज नाही. राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत पाच परदेशी विद्यापीठासोबत करार करून, तेथे शिकविले जाणारे अभ्यासक्रम नवी मुंबईत सुरू होणार आहेत. पहिले शैक्षणिक हब नवी मुंबईत उभारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली आहे, ती स्वागतार्ह आहे. मात्र, त्या आनुषंगाने परदेशात शैक्षणिक हबसाठी देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा आपण देऊ शकतो का, याचा सरकारने विचार करण्यासाठी गरज आहे. नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळापासून जवळच एज्युसिटी २५० एकर क्षेत्रात साकारली जात आहे. याच परिसरात येत्या काही वर्षांत मेडिसिटी, स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत दहा विद्यापीठे एकत्र येतील अशी संकल्पना राबविण्याचा विचार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी ओळखला जाईल. मुंबईची सध्या वित्तीय, औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. विद्यापीठामुळे एज्युकेशनल सिटी अशी ओळख होईल, असा राज्य सरकारचा मानस आहे. एज्युसिटी येथे आगामी कालावधीत १० विद्यापीठे एकत्र येतील, अशी संकल्पना असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले आहे. आता परदेशी विद्यापीठे भारतात येत असल्याने आपल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या देशात उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज नाही. आर्थिक अडचणीमुळे विद्यार्थी तिथे जाऊ शकत नाहीत. मात्र, आता त्यांना परदेशी विद्यापीठांच्या भारतातील कॅम्पसमध्ये शिकता येईल. जागतिक दर्जाचे हे शिक्षण विद्यार्थ्यांना २५ ते ३३ टक्के खर्चात मिळणार आहे. चांगल्या पगाराची नोकरी हा हेतू बहुसंख्य विद्यार्थ्यांचा असल्याने, भविष्यात परदेशात मिळणारी चांगल्या पगाराची पॅकेज आपल्या देशातील कंपन्यांना देता आली पाहिजेत. तरच परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ शकेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामाचा आढावा

आगामी कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील प्रस्तावित कामे पूर्ण व्हावीत–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

आगामी काळात होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी विमानतळ हे महत्त्वाचे विमानतळ असणार आहे. त्यामुळे हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी नुतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामाचा आढावा आज श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, अहिल्या नगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते.

शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरण व नुतनीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शिर्डीतील विमानतळावरील नवीन एटीसी इमारत, नवीन एकात्मिक मालवाहतूक इमारत,नवीन टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे आगामी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, ही कामे संथगतीने सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक वाटल्यास अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे. तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत. शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळाच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमाने पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. त्यादृष्टीने आतापासूनच शिर्डी विमानतळावर सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी जमिन संपादीत करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. पुरंदर विमानतळासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे आता या विमानतळासाठी लागणारी जमिन संपादीत करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पुणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने सुरू करावी. जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हे विमानतळ सुरू झाल्यावर महाराष्ट्रातील विमानसेवा आणखी वाढणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरू व्हावे, यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्याठिकाणी मोठी विमाने उतरण्याची सोय असावी, त्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, असे सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष स्वाती पांड्ये यांनी सादरीकरणाद्वारे शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामांची माहिती दिली. शिर्डी विमानतळासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार कंपनी व कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधींनीही माहिती दिली.

टेंभा मिरवणारे नव्हे,मशाल बनणारे पत्रकार बना–श्रीपाद अपराजित यांचे आवाहन

नागपूर । प्रतिनिधी

आजच्या युगात केवळ टेंभा मिरवणारे नव्हे, तर मशाल बनणारे पत्रकार होण्याची गरज आहे,असे मार्मिक आवाहन महाराष्ट्र टाइम्सचे नागपूर येथील निवासी संपादक श्रीपाद अपराजित यांनी रविवारी केले. मराठी साहित्य व पत्रकारितेच्या संगमस्थळी आयोजित या कार्यक्रमात त्यांनी नव्या पिढीतील पत्रकारांना मार्गदर्शन करताना संशोधनात्मक दृष्टिकोन बाळगण्याचा सल्ला दिला.

डॉ. राजेंद्र डोळके लिखित 'साहित्य मंथन' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात संपन्न झाला. साहित्य प्रसार केंद्र, नागपूर यांच्या वतीने प्रकाशित या पुस्तकात २०२३ मध्ये तरुण भारत, नागपूरच्या रविवार पुरवणीत प्रसिद्ध झालेले डोळके यांचे लेख समाविष्ट आहेत.

या प्रकाशनप्रसंगी लोकसत्ताचे संपादक देवेंद्र गावंडे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, साहित्य प्रसार केंद्राचे मकरंद कुलकर्णी आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास शिरपूरकर व्यासपीठावर उपस्थित होते. देवेंद्र गावंडे यांनी पत्रकारितेतील आजच्या बदलत्या प्रवाहावर भाष्य करताना सांगितले की, केबिनमध्ये बसून केली जाणारी पत्रकारिता कालबाह्य ठरत आहे. नव्या पत्रकारांनी थेट मैदानात उतरून संशोधनात्मक आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता करावी. नक्षलवादी विषयावर लेखन करणारे गावंडे यांनी तरुण पत्रकारांना स्पष्टपणे 'ऑन ग्राउंड' जाण्याचे आवाहन केले. प्रदीप दाते यांनी डॉ. डोळके यांच्या संशोधनपर लेखनाचे कौतुक करताना सांगितले की, त्यांच्या व्यक्तिगत ग्रंथालयात ५००० हून अधिक दुर्मिळ ग्रंथ आहेत. त्यांचे हे कार्य वडिलोपार्जित वारशाचा परिपाक असून, लवकरच हे पुस्तक विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट होईल.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री वृषाली देशपांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विवेक अलोनी (संचालक, विदर्भ साहित्य संघ ग्रंथालय) यांनी केले. या कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे नवनियुक्त विश्वस्त व अमरावती विभागाचे माहिती आयुक्त तथा माजी जिल्हाधिकारी रवींद्र ठाकरे, ॲड. आनंद परचुरे, प्रकाश ईदलाबादकर यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

बार्शीत छावा संघटनेचा सूरज चव्हाण विरोधात आक्रमक एल्गार

बार्शी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या न्यायहक्कांसाठी सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्यावर छावा संघटनेने थेट हल्लाबोल केला आहे. सूरज चव्हाण रस्त्यावर दिसेल तिथे छावा स्टाईलने लाथांनी तुडवू, अशा रोषपूर्ण शब्दांत बार्शी तालुका अध्यक्ष धीरज शेळके यांनी आक्रमक इशारा दिला. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या कृषिमंत्री आणि सरकारविरोधी आंदोलनादरम्यान, राज्याच्या कृषी विभागात सुरू असलेल्या पत्त्यांच्या ऑनलाईन गेम प्रकरणावर जाब विचारणाऱ्या छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांना सूरज चव्हाण व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जबर मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात घाडगे पाटील गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त होत आहे.

छावा संघटनेने याप्रकरणी सूरज चव्हाण यांच्यावर कलम ३०७ अंतर्गत (खुनाचा प्रयत्न) गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची जोरदार मागणी केली आहे. यासंदर्भात बार्शी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात कारवाई न झाल्यास छावा संघटना संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडेल व त्याची जबाबदारी शासनावर असेल असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनप्रसंगी छावा संघटनेचे तालुका अध्यक्ष धीरज शेळके, शहराध्यक्ष निलेशराजे पवार, विनायक (मामा) घोडके, प्रविण पवार, सचिन मोरे, बजरंग पवार, अक्षय पाटील, किसन घोडके, अभिजित शिराळ, अतिष थोरात यांच्यासह छावा संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाचा पुरस्कार प्राप्त चंद्रकांत काळोखे यांचा फकिरा कादंबरी भेट देऊन सन्मान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्य शासनाचा राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भानुदास काळोखे यांचा शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजिक विचारमंच, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नुकताच फकिरा कादंबरी भेट देऊन सन्मान करण्यात आला.

पेमराज सारडा महाविद्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात काळोखे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष सुनिल सकट, सावित्रीची लेक पुरस्कार प्राप्त उषाताई शिंदे यांच्यासह इतर मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोक शिंदे म्हणाले की, चंद्रकांत काळोखे हे सामाजिक क्षेत्रातील झुंजार कार्यकर्ते आहेत. त्यांनी वंचित, ०मागास, उपेक्षित घटकांसाठी गेली अनेक वर्षे अविरतपणे कार्य केले आहे. छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक न्यायाचा विचार काळोखे यांच्या कार्यात ठळकपणे दिसून येतो. त्यांना मिळालेला पुरस्कार सर्व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी स्फूर्तीदायक आहे. फकिरा कादंबरी म्हणजे सामाजिक संघर्ष आणि बदलाचं प्रतीक असून, हेच प्रतीक घेऊन काळोखे यांचा सन्मान करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुनील सकट म्हणाले की, आज समाजाला नव्या नेतृत्वाची गरज आहे. जे शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालेल व समाजात परिवर्तन साधेल. काळोखे हे त्याच विचाराने समाजात कार्य करत आहे. फकिरा ही केवळ कादंबरी नाही, ती एक सामाजिक चळवळीची स्फूर्ती आहे. सामाजिक चळवळीला स्फुर्ती देण्यासाठी आणि त्यांना मिळालेल्या पुरस्काराचा अभिमान म्हणून त्यांचा हा सन्मान करण्यात आले असल्याचे ते म्हणाले.

रनवेवर एअर इंडियाचं विमान घसरलं, मुंबई विमानतळावर अपघात टळला

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई विमानतळावर एक मोठा विमान अपघात टळला आहे. एअर इंडियाचे विमान लँडिंग करत असताना रनवेवर घसरले. हे विमान कोच्चीहून मुंबईला येत होते. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (उडचख-) प्रवक्त्याने सांगितले की, २१ जुलै रोजी सकाळी ९:२७ वाजता कोच्चीहून येणारे एक विमान मुंबईच्या रनवेवरून बाहेर घसरले. रनवेवरून बाहेर घसरण्याच्या घटनेनंतर तातडीने उडचख- च्या आपत्कालीन प्रतिसाद पथकांना कार्यरत करण्यात आले. सर्व प्रवासी आणि चालक दल पूर्णपणे सुरक्षित आहेत.

प्रवक्त्यांनी पुढे सांगितले की, मुख्य रनवे ०९/२७ मध्ये किरकोळ नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे, विमानतळावरील कामकाज सुरू ठेवण्यासाठी दुसरा रनवे १४/३२ कार्यान्वित करण्यात आला आहे. उडचख- मध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे.

एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी पुढे सांगितले की, २१ जुलै २०२५ रोजी कोच्चीहून मुंबईला येणाऱ्या फ्लाइट क्रमांक -I2744 चे लँडिंग होत असताना मुसळधार पावसामुळे लँडिंगनंतर विमानाला रनवेवरच चक्कर मारावी लागली. तरीही, विमान सुरक्षितपणे गेटपर्यंत पोहोचवण्यात आले आणि सर्व प्रवासी तसेच चालक दलाचे सदस्य सुरक्षितपणे विमानातून उतरले. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विमानाची तपासणी करण्यासाठी ते थांबवण्यात आले आहे. प्रवासी आणि चालक दलाच्या सुरक्षेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

शहरात बालरोग तज्ञांची मिड टर्म सीएमई परिषदेत बालकांच्या विविध आजारांवर चर्चा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर बालरोग तज्ञ संघटना आणि महाराष्ट्र बालरोग तज्ञ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात आयोजित करण्यात आलेली मिड टर्म सीएमई परिषद उत्साहात पार पडली. सावेडी येथील हॉटेल संजोग मध्ये झालेल्या या परिषदेला जिल्ह्यातील बालरोग तज्ञ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मिड टर्म सीएमईचे उद्घाटन राष्ट्रीय बालरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. वसंत खळतकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी अध्यक्ष डॉ. नितीन शहा, डॉ. प्रमोद जोग, राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी डॉ. योगेश पारिख (गुजरात), महाराष्ट्र बालरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय पाखमोडे, सचिव डॉ. अमोल पवार उपस्थित होते.

डॉ. मेघना चावला यांनी मुलांची उंची वाढविण्यासाठी आहार, व्यायाम यासंदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. संदीप पाटील यांनी झटक्यांच्या पेशंट वरती कसे उपचार करायचे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. लिजा बुलसारा यांनी रक्ताचे रिपोर्ट कशाप्रकारे वाचले पाहिजे आणि उपचार पध्दतीवर प्रकाश टाकला.

नवजात अर्भकांच्या बाबतीमध्ये जन्मतः स्क्रीनिंग चाचणीची गरज यावरती प्रसिद्ध तज्ञ डॉ. प्रदीप सूर्यवंशी व्याख्यान दिले. डॉ. विष्णू बिरादार यांनी मुलांमधील कावीळ या गंभीर प्रश्नावर चर्चा केली. मुलांमधील लर्जी विषयी डॉ. विजय वरद आणि डॉ. सिद्धांत ललवाणी यांनी सारखा सारखा होणाऱ्या निमोनिया वरती उपचार पध्दतीबद्दल माहिती दिली. मुंबई येथील प्रसिद्ध डॉ. नितीन शहा यांनी लसीकरणाबद्दल नवीन व अद्यावत माहिती सांगितली. माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रमोद जोग यांनी औषधांचे प्रीस्क्रीप्शन काळजीपूर्वक लिहिण्याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. रचना मोहिते यांनी लहान मुलांमधील संधिवात आणि त्याचे प्रकार, उपचार पध्दती यावर चर्चा केली. परिषदेत डॉ. प्रताप पटारे यांनी मॉडरेटर म्हणून काम पाहिले. तर एक्सपर्ट म्हणून डॉ. गोपाल बहुरुपी, डॉ. विद्या बांगर आणि डॉ. आदिती देशपांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ.सुचित तांबोळी यांनी मुलांमधील सर्वसाधारण वर्तन समस्या आणि त्यावरील उपचार पध्दतीवर मार्गदर्शन केले. लहान मुलांमधील हृदयाचे आजार कसे ओळखाचे याची लक्षणे डॉ. रचना साबळे यांनी सांगितले. लहान मुलांमधील लिव्हर ट्रान्सप्लांट यावर डॉ.मनोज श्रीवास्तव तर जनरेशन बीटा चॅलेंजेस यावर डॉ. समीर दलवाई यांनी व्याख्यान दिले.

ही परिषद यशस्वी होण्यासाठी संयोजक डॉ.सचिन वहाडणे, डॉ. सागर वाघ, अहिल्यानगर बालरोग तज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ.जयदीप देशमुख, सचिव डॉ. उज्वला शिरसाट, खजिनदार डॉ. संदीप गायकवाड, विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालय (विळद) येथील अधिष्ठाता डॉ.सुनील म्हस्के, डॉ. नानासाहेब अकोलकर, डॉ.श्याम तारडे, डॉ. चेतना बहुरूपी, डॉ. गणेश माने, डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. मकरंद धर्म आदींनी परिश्रम घेतले.

गाड्या बंगले असणाऱ्यांसाठी ही योजना नाही भुजबळ यांचे लाडकी बहीण योजनेवर वक्तव्य

निकषात न बसणाऱ्यांनी माघार घ्यावी–मंत्री छगन भुजबळ

नाशिक (वृत्तसंस्था)
लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेविषयी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी एक मोठे विधान केले आहे. भुजबळ म्हणाले, ज्यांच्याकडे गाड्या, बंगले आहेत, त्यांच्यासाठी ही योजना नाही. ही योजना गरिबांसाठी आहे, श्रीमंतांसाठी नाही. नाशिक जिल्ह्यातील लासलगावमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना छगन भुजबळ बोलत होते.छगन भुजबळ यांच्या या स्पष्ट विधानामुळे लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांची अट अधिक स्पष्ट झाली आहे. पुढे ते म्हणाले, मी मागेच सांगितले होते की स्वतःहून त्यांनी सांगावे मी या नियमांमध्ये बसत नाही. एवढे करुनही ती मंडळी यामध्ये बसत असतील तर ते अडचणीचे होते. अजूनही गाडी बंगले असतील त्यांनी या लाडकी बहिण योजनेतून माघार घ्यावी असे आवाहन भुजबळ यांनी केले.
आतापर्यंत दिले असेल त्यांच्यावर अजून काही कारवाई होऊ नये यासाठी मी प्रयत्न करेल असेही भुजबळ म्हणाले. पोर्टल बंद नाही, मी डिटेल माहिती घेऊन सांगतो असेही ते म्हणाले. जे या नियमांमध्ये बसत नाहीत त्यांनी कृपा करून थांबावे. खरोखरच ज्यांना आवश्यकता आहे त्यांना न्याय मिळेल. पोर्टलबाबत मी मंत्र्यांसोबत बोलून घेईल, असेही छगन भुजबळ म्हणाले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी सुरू करण्यास मान्यता दिली. या योजनेचा उद्देश राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणे, त्यांचे आरोग्य व पोषण सुधारण्यासाठी मदत करणे, तसेच कुटुंबातील त्यांच्या निर्णायक भूमिकेला बळकटी देणे असा आहे.या योजनेंतर्गत, महाराष्ट्रातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांचा आर्थिक लाभ थेट त्यांच्या खात्यात (उ्हढ द्वारे) जमा केला जातो. ही योजना विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी राबवण्यात येत असून, त्यांना स्थैर्य आणि स्वावलंबन मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

उमरखेडात शिवसेना रिपब्लिकन सेनेच्या युतीचा जल्लोष

उमरखेड । प्रतिनिधी
राज्यातील आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठी राजकीय घडामोड उमरखेडात पाहायला मिळाली. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेने युती करत एकत्र निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असून, यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय समीकरणं बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
या ऐतिहासिक युतीची अधिकृत घोषणा मुंबईत १६ जुलै रोजी संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली. शिवसेनेचे पालकमंत्री संजूभाऊ राठोड आणि रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पाटील चिंचोलकर यांच्यात युती झाल्यामुळे दलित आणि मराठी मतांची मोठी एकजूट घडेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त केला जात आहे.
उमरखेड शहरात माहेश्वरी चौकात शिवसेना व रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि घोषणाबाजी करत जल्लोषात युतीचे स्वागत केले. या वेळी दोन्ही पक्षांचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यवतमाळ जिल्ह्यात संजूभाऊ राठोड यांची लोकप्रियता आणि गोरगरिबांप्रती असलेली कळकळ तसेच सुनिल चिंचोलकर यांचे दलित समाजातले प्रभावी नेतृत्व ही दोन्ही शक्ती एकत्र आल्याने, स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांचे पारडे अधिक भक्कम होणार आहे.
यावेळी शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल चिंचोलकर, तालुकाध्यक्ष गौतम नवसागरे, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, ड. संजीवकुमार जाधव, माजी उपजिल्हाप्रमुख कैलास कदम, बसवेश्वर क्षिरसागर, प्रवीण मिराशे, संदीप ठाकरे, तसेच गजानन भोयर, भावराव भोयर, देवबन गोस्वामी, नंदू इटकरे, सचिन दवणे, वसंत देशमुख, दामोदर इंगोले यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.या युतीमुळे केवळ यवतमाळच नव्हे तर राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेना – रिपब्लिकन सेनेच्या एकत्रित लढ्यामुळे सत्तेचे नवे समीकरण निर्माण होईल, असा विश्वास नेतेमंडळी आणि कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.

शिक्षकांचे संसद दर्शन: लोकशाहीचा थेट अनुभव

खासदार नीलेश लंके यांची अभिनव संकल्पना शिक्षकांच्या मनात ठसली

पारनेर । प्रतिनिधी
शिक्षक समाजाचा खरा शिल्पकार असून त्यांच्या कार्याला मान्यता मिळाली पाहिजे, या जाणिवेतून खासदार नीलेश लंके यांनी एक अभूतपूर्व उपक्रम राबवत २०० पेक्षा अधिक निवृत्त शिक्षकांसाठी संसदेच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले. १९ जुलै रोजी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर शुभेच्छुकांच्या उपस्थितीत या ऐतिहासिक दौऱ्याला सुरुवात झाली. विशेष बाब म्हणजे खासदार लंके स्वतः या सर्व शिक्षकांसोबत दिल्लीपर्यंत रेल्वेने प्रवास करत त्यांच्या सुखसोयींची काळजी घेत होते.दिल्लीतील तीन दिवसांच्या या दौऱ्यात शिक्षकांना भारतीय संसदेचे कामकाज प्रत्यक्ष अनुभवता आले. त्यासोबतच अक्षरधाम मंदिर, लाल किल्ला यांसारख्या ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी देऊन त्यांनी इतिहास व संस्कृतीचा समृद्ध

अनुभव घेतला.
या दौऱ्याचा केंद्रबिंदू म्हणजे भारतीय संसद भवनाला दिलेली भेट. विशेषतः दौऱ्याचा दिवस पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी असल्यामुळे शिक्षकांना लोकसभा व राज्यसभेतील कामकाज थेट पाहता आले. राज्यसभेतील गंभीर चर्चा, लोकसभेतील गोंधळ, मंत्र्यांची भाषणे, प्रश्नोत्तरांचे सत्र यामुळे शिक्षक भारावून गेले. विविध पक्षांचे खासदार, मंत्री आणि अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने अनुभव अधिक संस्मरणीय ठरला. खासदार नीलेश लंके यांनी शिक्षकांचा संसदेत औपचारिक परिचय करून देत त्यांचे योगदान पुढे मांडले आणि शिक्षकांचा सन्मान म्हणजे देशाच्या भविष्याचा सन्मान अशी भावनिक भावना व्यक्त केली.या अभ्यास दौऱ्यात निवासाची चोख व्यवस्था, वातानुकूलीत बसद्वारे स्थळदर्शन, वेळेवर नाश्ता व भोजन या सर्व बाबी नीट नियोजित होत्या. कोणत्याही गटाला त्रास होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी खासदार लंके आणि त्यांच्या कार्यसंघाने पेलली. शिस्तबद्ध व्यवस्थापन, आत्मीयता आणि जबाबदारी यांचा उत्कृष्ट समन्वय या कार्यक्रमातून दिसून आला.या दौऱ्यामुळे निवृत्तीनंतर विस्मरणात गेलेल्या शिक्षकांना मान, आदर आणि आत्मिक समाधान लाभले. आमचं संपूर्ण आयुष्य इतरांचे भविष्य घडवण्यात गेलं, पण आज आमचा भूतकाळ कोणीतरी आठवला, हे खूप मनाला भिडणारं आहे, अशा भावना अनेक शिक्षकांनी व्यक्त केल्या. संसदेतील अनुभव, ऐतिहासिक स्थळदर्शन, नीट व्यवस्थापन आणि खासदार लंके यांची आपुलकी यामुळे शिक्षकांचा हा दौरा आयुष्यातील अविस्मरणीय आठवण बनून गेला.

चांगल्यासाठी बदल स्वीकारा; संवादकौशल्ये विकसित करा–निलेश पाटील यांचे आवाहन

पालघर । प्रतिनिधी
काळ बदलत असतो. त्यामुळे आपणही काळानुसार बदलले पाहिजे. चांगल्यासाठी बदल स्वीकारा आणि संवादकौशल्ये विकसित करा,असे प्रेरणादायी आवाहन निलेश पाटील यांनी चिंचणी येथे केले.
चिंचणी–तारापूर शिक्षण संस्थेच्या पी. एल. श्रॉफ कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त बक्षीस वितरण व पदवीप्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी पाटील प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करत होते.
कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता बारी यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मकतेचा संदेश देत सांगितले की, स्वतःची तुलना इतरांशी करू नका. शिक्षणाला आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य द्या. कठोर परिश्रमाचे महत्त्व समजून घ्या आणि त्यानुसार कृती करा.
कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि संस्थेचे चेअरमन रजनीकांत श्रॉफ यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, एक जबाबदार नागरिक घडण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणकाळ हा

अत्यंत मौल्यवान आहे. या काळात सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करा.
प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचिता करवीर यांनी संस्थेच्या वाटचालीचा आणि महाविद्यालयाच्या यशाचा आढावा घेतला. या समारंभात महाविद्यालयाच्या ३९ व्या कार्यवृत्तांताचे प्रकाशन करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे, प्रमाणपत्रे आणि पदव्या देऊन गौरविण्यात आले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. परवीन कलाडिया आणि केतल कडू यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. प्रेरणा राऊत यांनी मानले.
या प्रसंगी संस्थेच्या सदस्या डॉ. रमिलाबेन श्रॉफ, महेश पाटील, काशिनाथ पाटील, प्रा. संजय घरत, प्रा. जनार्दन शिंदे, निशिकांत जोशी, रंजना राऊत, प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचणीचे डॉ. गणेश पांचाळ आणि महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या भविष्याशी पत्त्यांचा खेळ!

कोकाटेंच्या ऑनलाईन रमीप्रकरणी ठाकरेंच्या शिवसेनेचा धुळ्यात भर चौकात झणझणीत निषेध

धुळे । प्रतिनिधी
शेतकऱ्यांनो, शेती विसरा आणि रमी खेळा! अशा उपरोधिक घोषणा देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) ने राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या ऑनलाईन रमी खेळप्रकरणी भर चौकात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. झाशी राणी चौकात चक्क पत्त्यांचा डाव मांडून, विधीमंडळ म्हणजे पत्त्यांचा क्लब नाही! असा गगनभेदी घोष करत सरकारच्या निष्काळजी धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.पावसाळी अधिवेशनात विधीमंडळात बसलेले असताना कृषीमंत्री कोकाटे ऑनलाईन रमी खेळत असल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. देशात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असताना, शेतकऱ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या मंत्र्यांचा हा हलगर्जीपणा निषेधार्ह असून, अशा मंत्र्याला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरत नाही, असा

आरोप शिवसेनेकडून करण्यात आला.
या आंदोलनाच्या माध्यमातून केवळ माणिकराव कोकाटे नव्हे, तर सत्ताधाऱ्यांच्या एकूणच निष्क्रियतेवर हल्लाबोल करण्यात आला. शेतकऱ्यांना हमीभाव नाही, कर्जमाफी नाही, पण मंत्री मात्र पत्त्यांच्या डावात गुंग! अशा घोषणा देत आंदोलकांनी परिसरात सरकारविरोधी वातावरण निर्माण केले. तसेच लातूरमध्ये छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याचाही या वेळी निषेध व्यक्त करण्यात आला.
या आंदोलनात जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, माजी महापौर भगवान करणकाळ, उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी, महानगरप्रमुख धीरज पाटील यांच्यासह भरत मोरे, सुनील पाटील, निंबा मराठे, आनंद जावडेकर, कपिल लिंगायत, पंकज भारस्कर, संदीप चौधरी, अमोल ठाकूर, शुभम रणधीर, हर्षल वाणी आदी मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.कृषीमंत्र्यांनी तत्काळ नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अन्यथा संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शिवसेनेकडून देण्यात आला आहे.

ठाण्यात उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानासाठी नगरविकास विभागातून ५ कोटीचा निधी

ठाणे । प्रतिनिधी
उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने व्हावी यासाठी नगरविकास विभागाकडून ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागास पाच कोटींचा निधी देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात केली. ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब आणि आदित्य बिरला कॅपिटल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'उपमुख्यमंत्री निरोगी महिला' अभियानाचा आज ठाण्यातील लोकमान्य नगरमधील कोरस आरोग्य केंद्रात शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. प्रसंगी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, डॉ.प्रसाद पाटील, डॉ.कारखानीस, आदित्य बिर्ला फाउंडेशनचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लबचे महाजन आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.
गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपाय करणे शक्य होते. आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या कायम कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे या शिबिराकडे दुर्लक्ष न करता जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी याप्रसंगी केले. माझ्या लाडक्या बहिणींसाठी हे अभियान सुरू करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत पाच लाख महिलांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले. गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद याचा अंतर्भाव या शिबीरात करण्यात येणार आहे. यासाठी इथे सोनोग्राफीची अद्ययावत मशीन, मॅमोग्राफीची गाडी सज्ज ठेवण्यात आली आहे. त्या माध्यमातून नामवंत डॉक्टरांची मदत घेऊन हे अभियान राबविण्यात येईल असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ प्रसाद पाटील यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077